# कविता

## घर

(घर या शब्दाला अन्न, वस्त्र, निवारा या प्राथमिक गरजेपेक्षा कितीतरी मोठा अर्थ आहे. अगदी लहानपणीच चिऊ–काऊच्या गोष्टीतून घराची आणि आपली भेट होते आणि आयुष्यभर वेगवेगळ्या रूपाने, वेगवेगळ्या अर्थाने ते कायम आपल्या सोबत राहते. यातूनच मग "घर असावे घरासारखे, नकोत नुसत्या भिंती, तिथे असावा प्रेम–जिव्हाळा, नकोत नुसती नाती" यासारखे काव्यरूप घेते. याच घरावर लिहिलेली एक कविता.)

घर, एक वास्तू विटा मातीची
घर, एक कल्पना प्रत्येकाच्या मनाची

घर थारा निवारा, कष्टाचे अन घामाचे
घर इच्छा आशा, सुखद आठवणींचे

घर महाल वाडा झोपडे, वारूळ गुहा खोपटे
कधी कपार उंच कड्याची, कधी भुयार पोखरलेले

घर बालपणीचे, भातुकलीतल्या खेळातले
गोष्टीतल्या चिऊ काऊचे, एक मेणाचे एक शेणाचे

घर तारुण्याचे, जिद्द अपेक्षा आकांक्षेचे
भविष्याच्या ओढीचे, गोड गुलाबी स्वप्नांचे

घर वार्धक्याचे, आश्रयाचे अन आधाराचे
स्मरीत, विस्मरीत अशा, आठवणींच्या गोतावळयाचे

घर प्रेमाचे विश्वासाचे, नाती–गोती जुळल्या मनांचे
घर संशयाचे, विरल्या स्वप्नांचे, दुभंगले विभागलेले

घर असते प्रत्येकाचे, किती भिंती खिडक्या दारे
सजवायचे कसे भरावे कशाने, ते मात्र ठरवावे ज्याचे त्याने

**सुरेश नायर** (ॲन आर्बर, मिशिगन)